३६८

यथास्तु २०१५
पान-३०

# विसावा

~~प्रभो~~ देवा काय सांगू तुला
फक्त माझीच गाऱ्हाणी ?
तुला नित्य आळविले (~~आहे~~)
किती लहान थोरांनी !

तुझ्या दृष्टीत दाटला
अवघ्या विश्वाचा आनंद
तुझ्या सृष्टीत साठला
क्षमा सोबती सुगंध .

तुझ्या तर्जनीत आहे
कालचक्र सांधलेले
लाख गाऱ्हाण्यांचे युग
तुझ्या दारी बांधलेले

आता करणार आहे
अखेरीचा मीच धावा
प्रत्येकाच्या चिंतेतुनि
तुला मिळावा विसावा .

७।३।५८

सहदेव मरवामवे

'कृतता १९६१'